महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एम.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 9282 दिनांक:- 20/6/2024

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.१९/०६/२०२४

१. अपिलार्थी
श्री.श्रीनाथ चव्हाण
राहणार :- ५६, तळजाई माता वसाहत, सहकार नगर क्र. १
पुणे-४११००९.

२.जन माहिती अधिकारी तथा आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
पुणे महानगरपालिका.

श्री.श्रीनाथ चव्हाण
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक , पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलार्थी श्री.श्रीनाथ चव्हाण यांनी दि. १९/०४/२०२४ रोजी मा. जन माहिती अधिकारी तथा आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक , महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी कार्यालय यांचेकडे अर्ज करून मागणी केलेली माहिती .

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १९.०४.२०२४ | १९.०५.२०२४ | २५.०४.२०२४ | निरंक | |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण - श्री.श्रीनाथ चव्हाण यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे- दि. १९/०४/२०२४ रोजीचा माहिती अधिकार अर्जावर माहिती दिलेली नाही.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १७.०६.२०२४ | २८.०५.२०२४ | आहे | - | दि. १०.०६.२०२४ |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ | :- | दि. १९/०६/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता. |
| सुनावणीस अपिलार्थी | :- | उपस्थित |
| सुनावणीस जनमाहिती अधिकारी | :- | उपस्थित |

## विवेचन

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार २००५ अंतर्गत दि. १९.०४.२०२४ रोजी केलेल्या अर्जाच माहितीचे किती पाने आहेत याबाबत काहीही कळविले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहि देणेबाबत टाळाटाळ केली आहे असे सांगितले.

आकाशचिन्ह व परवाना विभागाकडील कार्यालयाकडील माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाच असून सदर बाबत आपण कार्यालयीन वेळेमध्ये समक्ष कार्यालयात उपस्थित राहिल्यास इकडील कार्यालयाकडील माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल त्यामधून आपणास आवश्यक असणाऱ्या माहितीचे पृष्ठ निर्देशित करून दिल्यास तसेच त्याचे प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे शुल्क मनपा को कार्यालयात जमा केल्यानंतर सदरची माहिती उपलब्ध करून देणेत येईल असे जन माहिती अधिकार तथा आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक यांनी सांगितले.

## -: आदेश :-

प्रस्तुत प्रथम अपील प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

अपिलार्थी श्री.श्रीनाथ चव्हाण यांनी दिनांक १९.०४.२०२४ रोजी या कार्यालयाकडे माहि अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कोंढवा येवलेवाडी कार्यालयास केलेल्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने ज माहिती अधिकारी तथा आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक यांनी दि. २५/०४/२०२४ ने माहिती अधिका अर्जाचे उत्तर कळविले आहे. तथापि माहिती अधिकार २००५ नुसार अपिलार्थी दिनांक २८/०५/२० रोजी माहिती अधिकार अर्जावर माहितीचे किती पाने आहेत याबाबत काहीच कळविले नाही. तसेच ज माहिती अधिकारी यांनी माहिती देणेबाबत टाळाटाळ केली आहे असे सांगून प्रथम अपील दाखल केले आहे

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जात नमूद केलेप्रमाणे इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहिती जन माहिती अधिकारी तथा आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक यांनी ७ दिवसात विनाशुल उपलब्ध करून देण्यात यावी.

तरी, सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

(हेमंत किरुळकर )
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः १९.०६.२०२४ ,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. श्री.श्रीनाथ चव्हाण
राहणार :- ५६, तळजाई माता वसाहत, सहकार नगर क्र. १
पुणे-४११००९.

२. जन माहिती अधिकारी तथा,
आकाशचिन्ह व परवाना निरीक्षक, कोंढवा येवलेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी......

Scanned by CamScanner